# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११८८
२५६२ ११९२
२५६२ ११९३
२५६२ ११९७

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
इ–मेल : affiliation@pun.unipune.ac

संदर्भ क्र. : सीए/ 967 | **स्पष्टीकरण** | दिनांक : 14 जून, २०२४

मा. प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय — BBA, BMS, BCA अभ्यासक्रमांबाबत.**

**संदर्भ — १. प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे (संलग्नता कक्ष) संदर्भ क्र. सीए/१३८, दिनांक २७ जानेवारी, २०२४ चे पत्र**
**२. प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १०६/२०२४ व १०८/२०२४ दिनांक २४ मे,२०२४**
**३. प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. सीए/९११ दिनांक ३ जून, २०२४**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रांस अनुसरून सर्व संबधित महाविद्यालयांना/परिसंस्थांना खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून ज्या महाविद्यालयांनी उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये विद्यमान अभ्यासक्रमांच्या मान्यते करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे प्रस्ताव पाठविलेले आहेत, त्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार सदर अभ्यासक्रम सुरु करता येतील. किंवा संदर्भ क्र. २ मध्ये नमुद अभ्यासक्रमांच्या नामाभिधांनांमध्ये करण्यात आलेल्या बदलानुसार अभ्यासक्रम सुरु करता येतील.

२. ज्या महाविद्यालय/परिसंस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे प्रस्ताव पाठविलेले नाहीत अशा महाविद्यालयांना संदर्भ क्र. २ मध्ये नमुद अभ्यासक्रमांच्या नामाभिधांनांमध्ये करण्यात आलेल्या बदलानुसार अभ्यासक्रम सुरु करता येतील.

३. उपरोक्त मुद्दा क्र. एक व दोन पैकी एकच अभ्यासक्रम महाविद्यालय/परिसंस्थेस सुरु करता येईल.

ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अभ्यासक्रमासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता घेतलेली आहे अथवा मान्यतेसाठी अर्ज केला आहे. परंतु त्यांना संदर्भ क्र. २ मध्ये नमुद अभ्यासक्रमाच्या नामाभिधांनांमध्ये करण्यात आलेल्या बदलानुसार सुरू करायचे असतील अशा बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदकडून अथवा शासन स्तरावर भविष्यात कोणत्याही प्रशासकीय अडचणी व न्यायालयीन बाब उदभवल्यास त्यांची सर्व जबाबदारी संबंधित महाविद्यालय आणि त्यांचे व्यवस्थापन यांची राहील. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर/लिंकवर अशी माहिती ३० जून पूर्वी अद्यावत करणे आवश्यक आहे.

आपला

(गिरीश बेत)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)